महाराष्ट्र शासन

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,

माहितीचा अधिकार

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

फोन नं. २६५७२५०४/०९/२२/५८, फॅक्स नं. २६५७२४७४, Email dish.maharashtra@gmail.com

Web-www.maharashramm.gov.in

१) योजना - निरंक.

२) कायदे व नियम-

**कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने अधिनियम १९६३.**

कारखान्यातील कामगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कारखाने अधिनियम हा सामाजिक कायदा १८८१ पासून अस्तित्वात आहे. त्यावेळी त्याची व्याप्ती कामगारांचे कामाचे तास, आठवडयाची सुट्टी, स्त्रिया व मुले यांचे विषयी तरतुदींचे सनियमन करणे इतकेच होते. त्यात १९११, १९२३, १९३५ मध्ये सुधारण होऊन १९४८ साली महत्वाच्या सुधारणा झाल्या. कामगारांच्या कामाच्या जागेची व यंत्राची सुरक्षितता, आरोग्य सुखसोयी (विश्रांती/ जेवणाच्या खोल्या पाळणाघर, उपचार खोली (ॲमब्युलन्स रुम) इत्यादी, कामाचे तास आठवडयाची सुट्टी , पगारी रजा, धोकादायक प्रक्रियेत काम करताना पाळावयाच्या तरतुदींचा समावेश आहे.

भोपाळ वायुगळतीच्या दुर्घटनेनंतर १९८७ मध्ये रासायनिक कारखान्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अमुलाग्र बदल करण्यात आले. कामगारांना कारखान्यात काम करताना सुरक्षितता व आरोग्यविषयी हमी घेण्याची जबादारी भोगवटादारावर टाकण्यात आली.

**कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३**

ज्या ठिकाणी कामगार राज्य विमायोजना अस्तित्वात नाही अशा ठिकाणी कामगारांना काम करताना किंवा कामाच्या अनुशंगाने काही कर्तव्ये बजावत असताना मृत्यू आल्यास किंवाकायमचे अपंगत्व आले, कारखान्यात काम करतांना व्यवसायजन्य रोग झाल्यास वैद्यकिय प्रमाणपत्राने सिध्द झाल्यास नुकसान भरपाई मिळू शकते. अशा अपघातात नुकसान भरपाई कामगारांस मिळून देण्यासाठी पाठपुरावा केला जातो. नुकसान भरपाईसाठी अर्ज जिल्हयाच्या नुकसान भरपाई आयुक्तांकडे (कामगार न्यायालय) करावा लागतो. हा अर्ज संबंधित कामगार, संघटना, वकिल यांचेमार्फत करता येतो.

**पर्यावरण नियंत्रण कायदा १९८६ व त्या खालील उत्पादन, साठवण, धोकादायक रसायनांची आयातविषयी नियम १९८९ व रासायनिक अपघात (आपत्ती योजना, प्रतिसाद, तयारी) नियम, १९९६ ची अंमलबजावणी.**

या नियमात धोकादायक रसायनांची यादी दिली आहे. कारखान्यात वरील नियमात नमुद केलेल्या प्रमाणाबाहेर साठवण, वापर होत असेल तर अशा कारखान्यांची गणना मोठे अपघात होऊ शकणारे कारखाने (मेजर ॲक्सिडेंट हॅजार्ड) मध्ये होते. अशा व्यवस्थापनांना सुरक्षितता व आरोग्यविषयक केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी लागून त्याविषयी हमी द्यावी लागते. कामगारांना वापरण्यात येणा-या रसायनांतील धोक्याची संपूर्ण माहिती द्यावी लागते व त्याविषयी हाताळणीसाठी प्रशिक्षण द्यावे लागते. कारखान्यात होणा-या दुर्घटनांवर वेळीच नियंत्रण ठेवण्यासाठी अंतर्गत अनर्थ निवारण योजना तयार करुन कार्यान्वित कराव्या लागतात. काही दुर्घटनात परिणामांची व्याप्ती कारखान्याबाहेर जाऊन आजुबाजूच्या रहीवाश्यांना हानी पोहचण्याचा संभव असतो, त्यासाठी जिल्हाधिका-यामार्फत जिल्हयासाठी बाहय अनर्थ निवारण याजना केली जाते. त्यासाठी त्यांना जरुन ती माहिती पुरविण्याची जबाबदारी व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे. रासायनिक अपघाताच्यावेळी नियंत्रण व अपघातस्थळी जाऊन तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होण्यासाठी राज्य, जिल्हा, स्थानिक स्तरीय अरिष्ट निवारण समुह या नियमाखाली संगठीत करण्यात आले आहेत.

## 3) ध्येय-

### औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे कार्य मुख्यत्वे कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ मधील तरतुदीची अमंलबजावणी करण्याचे आहे. कारखान्यात काम करणा-या कामगारांची कारखानदाराकडून कोणत्याही प्रकारची पिळवणूक होणार नाही, तसेच त्यांना सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात काम करता यावे, म्हणून प्रभावीपणे कायद्यातील तरतुदीची अमंलबजावणी संचालनालयाकडून केली जाते. त्याकरिता कारखाने निरिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. कारखान्यात होणा-या अपघातांची चौकशी करुन भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत उपाययोजना करण्यासाठी कारखानदारांकडून कारखाने अधिनियम व त्या नियमांतर्गत तरतुदीची प्रभावीपणे अमंलबजावणी करुन घेण्यात येते.

या संचालनालयाचे मुख्य ध्येय कारखान्यात काम करणा-या कामगारांना कारखाने अधिनियम व महाराष्ट्र कारखाने नियम अतंर्गत तरतुदीची अमंलबजावणी प्रभावीपणे होऊन त्याचे फायदे त्यांच्यापर्यंत पोहचविण्याचे आहे.

४) प्रश्नावली-

| | |
|---|---|
| नेहमी विचारले जाणारी प्रश्नावली | १. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कोणत्या कायदयाची अंमलबजावणी केली जाते ?<br>उ. १. कारखाने अधिनियम १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम १९६३.<br>२. पर्यावरण नियंत्रण कायदा,१९८६ व त्याखालील उत्पादन, साठवण, धोकादायक रसायनांची आयातविषयी नियम १९८९ व रासायनिक अपघात नियम १९९६ ची अंमलबजावणी<br>३. कामगार नुकसानभरपाई कायदा, १९२३<br>२. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कोणते कामकाज प्रामुख्याने केले जाते ?<br>उ. १. कारखान्यांचे निरीक्षण करणे.<br>२. कारखाने नियमांतर्गत परवाना देणे.<br>३. कारखान्यातील अपघातांची चौकशी करणे व प्रतिबंधक उपाययोजना सुचवून कार्यान्वित करणे.<br>४. तकारींची चौकशी करणे.<br>५. धोकादायक कारखान्यांची विशेष तपासणी व त्याच्याकडून अंतर्गत अनर्थ निवारण योजना तयार करुन घेणे.<br>६. जिल्हास्तरीय अनर्थ निवारण योजना करणे.<br>७. धोकादायक कारखान्यांतील कामगारांची वैद्यकीय तपासणी करणे व सर्वेक्षण करणे.<br>८. सुरक्षिततेविषयी जाणीव व प्रसार करणे.<br>९. कारखान्यांविषयी सांख्यिकी माहिती उपलब्ध करणे.<br>१०. कायदेशीर कारवाई करणे.<br>११. स्त्री कामगारांविषयी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे.<br>१२. कल्याण अधिका-यांची नोंदणी करणे.<br>३. कामगार या संज्ञेत कोणत्या व्यक्ती येतात ?<br>उ. कारखान्यांत उत्पादनाच्या किंवा त्या अनुषंगाने केल्या जाणा-या कामात जी व्यक्ती वेतन किंवा वेतनाशिवाय, मालकास माहीत असो वा नसो, ती मुख्य मालकाकडून किंवा कंत्राटदाराकडून लावली असेल तर, ती व्यक्ती कामगार या व्याख्येत येते. कारखाने अधिनियमाखाली सर्व फायदे कंत्राटदारामार्फत लावलेल्या कामगारांनाही मिळतात, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा भेदभाव केला जात नाही. कायम, तात्पुरत्या बदली कामगार या सर्वांचा कामगार या संज्ञेत समावेश होतो.<br>४. कारखाना म्हणजे काय ?<br>उ. ज्या आस्थापनेत १० किंवा १० पेक्षा जास्त कामगार अश्वशक्तीसह २० किंवा २० पेक्षा कामगार अश्वशक्तीचा वापर न करता उत्पादन प्रकियेत काम करतात त्यांचा कारखाना या संज्ञेत |

पॉवरलूमसारखे उद्योग, लाकूडकाम करण्याच्या सॉ मिल, राईस मिल धोकादायक रसायने वापरुन प्रकिया चालतात. ॲस्बेटॉसचा वापर अशा जागांनासुध्दा कारखाने अधिनियम लागू केले आहेत. त्यामुळे धोकादायक काम चालणा-या लहान कारखान्यातील कामगारांना कायदयानुसार फायदे मिळतात.

कारखाने अधिनियम १९४८ खाली कायदेशीर परवाना असल्याशिवाय कोणत्याही भोगवटादाराला कोणत्याही जागेचा वापर करता येत नाही. म्हणून कोणत्या जागेचा कारखाना म्हणून वापर करता येतो हे जाणून घेणे नवीन उद्योजकांच्या अत्यंत महत्वाचे आहे.

५. कारखाने अधिनियमाखाली परवाना मिळविण्यासाठी कोणत्या अटी पूर्ण कराव्या लागतात ?

उ. कारखान्याच्या नोंदणीसाठी व तो चालू करण्यासाठी परवाना मिळविण्यासाठी निरीक्षक यांच्याकडे आपला अर्ज विहित नमुन्यात व खाली दर्शविलेल्या कागदपत्रांसोबत सादर केला पाहिजे.

१. कारखान्यांच्या जागेत इमारतीचे व संयंत्रांच्या मांडणीचे नकाशे पश्नावली अर्ज क. १ मध्ये सादर करावा लागतो.

२. कारखान्याच्या नोंदणीकरिता प्रत्येक कारखान्याच्या भोगवटादाराने किंवा व्यवस्थापनाने नमुना क. २ मधील अर्जाच्या तीन प्रती सादर केल्या पाहिजेत.

३. परवान्यासाठी अर्ज नमुना क. ३ मध्ये करावा लागेल.

४. नमुना ३ च्या अर्जावर २.५० रुपयांचा कोर्ट फी स्टॅप लावावा लागेल.

५. अशा प्रत्येक अर्जासोबत अनुसूचीत दाखविल्याप्रमाणे विहित केलेली परवाना फी, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्या नावाने कॉस्ड / कॉस्ड पोस्टल ऑर्डर पाठवावी. मुंबईबाहेरील उद्योजकांनी स्थानिक कोषागारात परवाना फी भरल्याची कोषागाराची पावती अर्जासोबत पाठवावी.

६. भागीदारी पत्र/लीजचा करार/मेमोरंडम आणि आर्टिकल ऑफ असोसिएशन किंवा इतर अशा कागदपत्रांची अनुप्रमाणित खरी प्रत भोगवटादारीचा पुरावा म्हणून अर्जासोबत जरुर असेल त्याप्रमाणे जोडली पाहिजे.

६. कारखाने अधिनियमाखाली नकाशे कसे मंजूर केले जातात ?

उ. कारखान्याच्या व्यवस्थापनाकडून नकाशे मंजुरीसाठी प्राप्त झाल्यावर त्यावर कमांक व तारीख टाकली जाते. कायदयाने घालून दिलेल्या शेवटच्या उच्च मुदतीची तारीख लाल शाईने घातली जाते. या मुदतीतच व्यवस्थापनास नकाशे मंजूर करुन एक प्रत पाठवावी लागते. मंजूर न केल्यास त्याची कारणे कळवावी लागतात.

व्यवस्थापनाने सादर केलेल्या नकाशात काही त्रुटी असल्यास, त्याविषयी सविस्तर मुद्दे देऊन जरुर पडल्यास नकाशे सुधारुन

| | |
|---|---|
| | घेण्यात येतात व आवश्यक ती माहिती घेतली जाते. कामगारांच्या सुरक्षितता व आरोग्य विषयीच्या तरतुदीस प्राधान्य देऊन जरुर असल्यास काही अटी घालून मंजूर केल्या जातात. काही अटींचे व्यवस्थापनास सातत्याने पालन करावे लागते.<br>७. परवाना कसा मिळतो ?<br>उ. व्यवस्थानाकडून नमुना क्र. २ व ३ पूणे भरुन विहित शुल्कासह मिळाला असल्यास, कारखान्याचे नकाशे मंजूर करुन घेतले असल्यास व कारखाने निरीक्षकांनी जागेस भेट दिल्यानंतर कारखान्याचे बांधकाम व यंत्रांची मांडणी नकाशाप्रमाणे आढळून आल्यास निरीक्षकांकडून परवाना देण्याविषयी सहाय्यक संचालकांमार्फत संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्याकडे शिफारस करण्यात येते व परवाना देण्यात येतो. परवान्याचे नुतनीकरणे सह<br>संचालकांकडून होऊ शकते.<br>८. नोंदणीकृत कारखान्याचे निरीक्षण कसे केले जाते ?<br>उ. कारखाने अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असलेल्या कारखान्याचे प्रतिवर्षी किमान एकदा निरीक्षकाकडून निरीक्षण केले जाते. व्यवस्थापनाला कारखान्यातील निरीक्षण पुस्तकात लेखी शेरे देऊन पूर्तता करुन घेण्यात येते.<br>९. नोंदणी न केलेल्या आस्थापनेला कारखाने अधिनियम कसे लागू केले जातात ?<br>उ. दरवर्षी सुमारे नोंदणी केलेल्या ४,००० आस्थापनांना भेटी दिल्या जातात. त्यातील कामगारांच्या संख्येनुसार किंवा अधिसूचनेप्रमाणे कारखाने अधिनियम लागू होतात काय, याची तपासणी केली जाते. स्वतःहून नोंदणी न करणा-या कारखानदारांना नोंदणी करण्यास भाग पाडले जाऊन तेथील कामगारांना कारखाने नियमांतर्गत फायदे मिळवून दिले जातात. पाठपुरावा करुनही नोंदणी न करणा-या कारखानदारांवर कायदेशीर कारवाई केली जाते.<br>१०. शासनाच्या अखत्यारीतील कारखान्यांना हे अधिनियम लागू होतात काय ?<br>उ. केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, संरक्षण विभाग, सार्वजनिक विभागाच्या अखत्यारीतील कारखान्यांनासुध्दा या अधिनियमाखाली परवाना देणे आवश्यक असते.<br>११. व्यवस्थापनास कारखाने अधिनियमानुसार अपघाताची सूचना कशी द्यावी लागते ?<br>उ. जो अपघात प्राणघातक असेल किंवा ज्या गंभीर अपघातात शरीराचा एखादा अवयव गमवावा लागला असेल, कामगार बेशुध्द पडला असेल, भाजल्यामुळे भयंकर जखमा झाल्या असतील, किंवा धोकादायक घटना घडल्या असतील अशा अपघाताचे वृत्त निरीक्षकांकडे ४ तासांच्या आत टेलिफोनने, तारेने वा खास संदेशवाहकातर्फे कळविले पाहिजे आणि १२ तासांच्या आत नमुना |

| | |
|---|---|
| | क.२४ मध्ये त्याचा लेखी अहवाल पाठविला पाहिजे. ज्या अपघातामुळे कामगार ४८ तास कामावर हजर राहू शकला नसेल त्याची माहिती त्यानंतरच्या पुढील २४ तासांच्या आत कळविणे आवश्यक आहे.<br><br>१२. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून अपघाताच्या घटनेविषयी काय कारवाई करण्यात येते ?<br>उ. या संचालनालयाकडून कारखान्यात होणा-या गंभीर/प्राणघातक अपघाताची त्वरित सखोल चौकशी करण्यात येते. अपघाताचे कारण शोधून ते टाळण्यासाठी व्यवस्थापनास प्रतिबंधक उपाययोजना सूचविण्यात येऊन त्याची पूर्तता करयास भाग पाडले जाते. अपघाताव्यतिरिक्त आग, स्फोट, वायूगळती, इमारती कोसळण अशा घटनांचीसुध्दा सखोल चौकशी केली जाते. काही वेळा संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्यास त्यावेळी उपलब्ध असलेला अधिकारी आदेशाची वाट न पाहता अपघातस्थळी जाऊन प्राथमिक चौकशी तातडीने करतो.<br>१३. अपघातातील मृत/जखमी कामगारांना नुकसान भरपाई कशी मिळते ?<br>उ. नुकसान भरपाई कायदयानुसार अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या वारसास नुकसान भरपाई मिळते. व्यवस्थापनास नुकसान भरपाई कायदयाच्या तरतुदीप्रमाणे ही रक्कम ठरवून नुकसान भरपाई आयुक्तांकडे एक महिन्याच्या आत जमा करावी लागते. ही रक्कम जमा करण्यासाठी या विभागाकडून पाठपुरावा केला जातो. |